# इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया, पुणे सन २०१६-१७

## प्रसिध्दी निवेदन दि.२६.०६.२०१६

पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील इयत्ता ११ वी चे प्रवेश शैक्षणिक वर्ष २०१६-१७ या वर्षीही ऑनलाईन पध्दतीने करण्यात येत आहेत. इ. ११ वी ऑनलाईन पध्दतीने प्रवेश वेळोवेळी निर्गमित झालेले शासन आदेशानुसार, सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षासाठीची तयार केलेली ऑनलाईन प्रवेश यादी घोषित करण्यास केंद्रीय प्रवेश समितीला आनंद होत आहे. ऑनलाईन पध्दतीने इयत्ता ११ वी ऑनलाईन पध्दतीने प्रवेशाबाबत पालकांनी समाधान व्यक्त केले आहे.

**इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिये द्वारा कला, विज्ञान, वाणिज्य या शाखेत प्रवेश दिले आहेत. शाखा/माध्यम निहाय कॉलेज संख्या व एकूण प्रवेश क्षमता खालील प्रमाणे आहेत.**

| अ.क्र/नांव | शाखा / माध्यम निहाय कॉलेज संख्या व प्रवेश क्षमता | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| शाखा | कला | | | वाणिज्य | | | विज्ञान | | एकुण |
| माध्यम | मराठी | इंग्रजी | एकुण | मराठी | इंग्रजी | एकुण | इंग्रजी | एकुण | कॉलेज/ शाखा कोड |
| कॉलेज संख्या | 70 | 34 | 104 | 106 | 122 | 228 | 199 | 199 | 218/531 |
| प्रवेश क्षमता | 7940 | 3380 | 11,320 | 12,340 | 18,455 | 30795 | 31270 | 31270 | 73385 |
| केंद्रीय प्रवेश प्रक्रियेकरिता उपलब्ध प्रवेश क्षमता | 6309 | 2576 | 8885 | 9606 | 13028 | 22634 | 23110 | 23110 | 54629 |
| प्राप्त अर्ज संख्या | 5316 | 2791 | 8107 | 14757 | 23082 | 37839 | 36160 | 36160 | 82106 |

**१. एस.एस.सी बोर्ड महाराष्ट्र राज्य तसेच सीबीएसई व इतर बोर्डाच्या विद्यार्थ्यांचे प्राप्त अर्जांचा शाखानिहाय तपशिल पुढील प्रमाणे आहे.**

| शाखा | ऑनलाईन अर्ज भरलेले विद्यार्थी संख्या | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | SSC Board महाराष्ट्र राज्य | CBSE BOARD | ICSE BOARD | IB BOARD | IGCSE BOARD | NIOS BOARD | OTHER BOARD | एकुण |
| **एकुण** | **68107** | **3651** | **1711** | **12** | **23** | **191** | **266** | **73961** |

| शाखा | ऑनलाईन भरलेले अर्ज | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | SSC Board महाराष्ट्र राज्य | CBSE BOARD | ICSE BOARD | IB BOARD | IGCSE BOARD | NIOS BOARD | OTHER BOARD | एकुण |
| कला (मराठी) | 5271 | 27 | 7 | 0 | 0 | 4 | 7 | 5316 |
| कला (इंग्रजी) | 2315 | 266 | 121 | 3 | 3 | 57 | 26 | 2791 |
| वाणिज्य(मराठी) | 14675 | 42 | 9 | 0 | 0 | 11 | 20 | 14757 |
| वाणिज्य(इंग्रजी) | 21559 | 864 | 394 | 7 | 8 | 138 | 112 | 23082 |
| विज्ञान(इंग्रजी) | 31970 | 2717 | 1303 | 4 | 14 | 18 | 134 | 36160 |
| **एकुण** | **75790** | **3916** | **1834** | **14** | **25** | **228** | **299** | **82106** |

**२. ऑनलाईन प्राप्त झालेल्या एकुण प्रवेश अर्ज व त्यानुसार मुला/मुलीचे प्राप्त अर्ज पुढील प्रमाणे आहे.**

| शाखा | कला (मराठी) | कला (इंग्रजी) | वाणिज्य (मराठी) | वाणिज्य (इंग्रजी) | विज्ञान (इंग्रजी) | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| मुलांची संख्या | 2667 | 913 | 7763 | 11794 | 21113 | **44250** |
| मुलींची संख्या | 2649 | 1878 | 6994 | 11288 | 15047 | **37856** |
| **एकुण अर्ज** | **5316** | **2791** | **14757** | **23082** | **36160** | **82106** |

ऑनलाईन प्राप्त झालेल्या मागासवर्गीय व बिगरमागासवर्गीय विद्यार्थ्यांची संख्या पुढील प्रमाणे आहे.

| शाखा | कला (मराठी) | कला (इंग्रजी) | वाणिज्य (मराठी) | वाणिज्य (इंग्रजी) | विज्ञान (इंग्रजी) | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| OPEN | 2274 | 2025 | 6770 | 15188 | 21924 | **48181** |
| SC | 1721 | 359 | 4102 | 3079 | 4197 | **13458** |
| ST | 134 | 19 | 342 | 209 | 529 | **1233** |
| DT/VJNT(A) | 232 | 35 | 599 | 400 | 606 | **1872** |
| NT1(B) | 203 | 43 | 536 | 553 | 735 | **2070** |
| NT2(C) | 154 | 23 | 456 | 375 | 1068 | **2076** |
| NT3(D) | 59 | 14 | 123 | 94 | 448 | **738** |
| OBC | 507 | 246 | 1696 | 2867 | 6093 | **11409** |
| SBC | 32 | 27 | 133 | 317 | 560 | **1069** |
| एकुण | 5316 | 2791 | 14757 | 23082 | 36160 | **82106** |

**३. ऑनलाईन प्राप्त झालेल्या एकूण अर्जापैकी विशेष आरक्षणांतर्गत विद्यार्थ्यांचा तपशिल पुढील प्रमाणे**

| आरक्षण/शाखा | कला (मराठी) | कला (इंग्रजी) | वाणिज्य (मराठी) | वाणिज्य (इंग्रजी) | विज्ञान (इंग्रजी) | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| आजी/माजी सैनिक | 18 | 37 | 33 | 186 | 564 | 838 |
| बदली संवर्ग | 5 | 9 | 9 | 20 | 77 | 120 |
| स्वा.सैनिक आरक्षण | 2 | 2 | 7 | 16 | 25 | 52 |
| अपंग संवर्ग | 71 | 89 | 100 | 447 | 1026 | 1733 |
| क्रीडा संवर्ग | 32 | 97 | 20 | 176 | 524 | 849 |
| कला/सांस्कृतिक संवर्ग | 85 | 39 | 48 | 61 | 44 | 277 |
| एकुण | 213 | 273 | 217 | 906 | 2260 | 3869 |

**४. ऑनलाईन प्राप्त झालेल्या एकूण प्रवेश अर्ज व त्यातील निवासानुसार वर्गवारी पुढील प्रमाणे आहे.**

| आरक्षण/शाखा | कला (मराठी) | कला (इंग्रजी) | वाणिज्य (मराठी) | वाणिज्य (इंग्रजी) | विज्ञान (इंग्रजी) | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| पुणे व पिंपरी चिंचवड मनपा क्षेत्रातील | 4550 | 2403 | 13146 | 20442 | 29164 | 70005 |
| पुणे व पिंपरी चिंचवड मनपा क्षेत्राबाहेरील | 757 | 337 | 1594 | 2139 | 6707 | 11534 |
| महाराष्ट्र राज्यबाहेरील किंवा भारताबाहेरील | 9 | 51 | 17 | 201 | 289 | 567 |
| एकुण अर्ज | 5316 | 2791 | 14757 | 23082 | 36107 | 82106 |

**ऑनलाईन प्राप्त झालेल्या एकुण प्रवेश अर्ज व त्यातील निकालानुसार वर्गवारी पुढील प्रमाणे आहे.**

| शाखा | कला (मराठी) | कला (इंग्रजी) | वाणिज्य (मराठी) | वाणिज्य (इंग्रजी) | विज्ञान (इंग्रजी) | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| **Fresher** | 4995 | 2692 | 14323 | 26658 | 35898 | 80566 |
| **Repeater** | 90 | 24 | 89 | 72 | 12 | 287 |
| **Previously passed** | 231 | 75 | 345 | 352 | 250 | 1253 |
| **एकुण अर्ज** | 5316 | 2791 | 14757 | 27082 | 36160 | 82106 |

५. कला, विज्ञान व वाणिज्य शाखा (मराठी व इंग्रजी माध्यम) साठी जेवढया प्रवेश इच्छुकांनी अर्ज केला होता. त्यांना प्रथम फेरीत शाखा व माध्यमनिहाय आलेल्या प्रवेश अर्जानुसार प्रस्तावित पसंती क्रमांक तपशील खालीलप्रमाणे

| शाखा | माध्यम | दिलेला प्रवेश | १ ला पसंतीक्रम | २ ते ५ पसंतीक्रम मिळालेले | ६ ते १० पसंतीक्रम मिळालेले | ११ ते २० पसंतीक्रम मिळालेले | २१ ते३० पसंतीक्रम मिळालेले | ३० पुढील पसंतीक्रम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कला | मराठी | 4896 | 3215 | 1304 | 243 | 79 | 41 | 14 |
| कला | इंग्रजी | 1976 | 383 | 936 | 428 | 111 | 78 | 40 |
| वाणिज्य | मराठी | 9606 | 4447 | 3153 | 928 | 642 | 304 | 132 |
| वाणिज्य | इंग्रजी | 13028 | 3896 | 4363 | 1909 | 1741 | 738 | 381 |
| विज्ञान | इंग्रजी | 23110 | 6678 | 7779 | 3426 | 3079 | 1266 | 882 |
| **एकूण** | | **52616** | 52616 | **17535** | **6934** | **5652** | **2427** | **1449** |

**विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रवेश देण्याचे वेळापत्रक पुढील प्रमाणे आहे.**

| अ.क्र. | दिनांक | वेळ | तपशील |
|---|---|---|---|
| १ | २७ जून १६ | स.१०.३० वाजता | केंद्रीय प्रवेशाची पहिली गुणवत्ता यादी प्रसिध्द |
| २ | २७ जून १६ ते ३० जून १६ | स.११.०० ते सायं. ४.०० वाजेपर्यंत | केंद्रीय प्रवेशाच्या पहिल्या गुणवत्ता यादीतील प्रवेश |
| ३ | १ जुलै १६ | स.११.०० वाजता | कनिष्ठ महाविद्यालये रिक्त जागांनुसार कोटयातील प्रवेश (इनहाऊस/अल्पसंख्यांक/व्यवस्थापन) दुसरी गुणवत्ता यादी प्रसिध्द करतील. |
| ४ | १ जुलै १६ व २ जुलै १६ | स.११.०० ते सायं ४.०० | कनिष्ठ महाविद्यालये वर नमूद कोटयातील प्रवेश करतील. सदर प्रत्येक प्रवेश कॉलेज लॉग-इन मध्ये ऑनलाईन अपडेट करुनच करावा. |
| ५ | ५ जुलै १६ | सायं. ५.०० वाजता | केंद्रीय प्रवेशाची दुसरी गुणवत्ता यादी प्रसिध्द |

## कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेताना विद्यार्थ्यांनी करावयाची कार्यवाही .

१. आपला प्रवेश कोणत्या कनिष्ठ महाविद्यालयात निश्चित झाला आहे, याची खात्री http://pune.fyjc.org.in या संकेतस्थळावर आपला प्रवेश अर्ज क्रमांक टाकून करावी.

२. ज्या महाविद्यालयात आपला प्रवेश निश्चित झाला आहे, त्या कनिष्ठ महाविद्यालयात ऑनलाईन प्रवेश अर्जाची प्रिंट आउट घेवुन जावून तेथील प्राचार्याशी संपर्क साधावा व त्यांनी दिलेल्या सूचनेनुसार मूळ कागदपत्रे सादर करुन (केवळ फक्त रु.५०/-फी भरुन) आपला प्रवेश घ्यावा.

३. प्रवेश घेण्याचा कालावधी वरील वेळापत्रकाप्रमाणे राहील.

४. विहित मुदतीत प्रवेश न घेतल्यास आपण केंद्रीय प्रवेश प्रक्रियेतुन पूर्णतः बाहेर जाल व आपणांस पुढील फेरीतील बेटरमेंटची (उन्नत प्रवेशाची )संधी मिळणार नाही व त्याबाबत कोणतीही सबब ऐकून घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

५. ज्या विद्यार्थ्यांना केंद्रीय प्रवेशाच्या पहिल्या गुणवत्ता यादीत प्रवेश मिळाला आहे व त्यांनी यापूर्वी कोटा अंतर्गत प्रवेश (इनहाऊस/अल्पसंख्यांक/व्यवस्थापन कोटा) निश्चित केला आहे त्यांनी केंद्रीय प्रवेश पहिल्या गुणवत्ता यादीतील प्रवेश ३० जून २०१६ पर्यंत निश्चित करणे आवश्यक आहे. अन्यथा अशा विद्यार्थ्यांचा कोटयातील प्रवेश अंतिम समजला जाईल व ते कोणत्याही बेटरमेंटला पात्र नसतील.

६. ज्या विद्यार्थ्यांनी यापूर्वी कोटयांतर्गत प्रवेश निश्चित केला आहे, तथापि, केंद्रीय प्रवेशाच्या गुणवत्ता यादीतुन मिळालेला प्रवेश त्यांना निश्चित करावयाचा असल्यास पूर्वीचा कोटयातील प्रवेश रद्द करुन त्याची संगणकीकृत पावती घेतल्यानंतरच केंद्रीय प्रवेश निश्चित करता येईल.

७. जर आपले नांव कुठल्याच महाविद्यालयासाठी पहिल्या गुणवत्ता यादीत आले नसेल तर पुढच्या गुणवत्ता यादीची वाट पहा.

८. क्रमशः दुसरी व तिसरी गुणवत्ता यादी जाहीर होणार आहे. पुढील बेटरमेंट फे-यामध्ये आपल्या पसंतीक्रमानुसार वरचे महाविद्यालयात प्रवेश मिळाल्यास आधी प्रवेश घेतलेल्या महाविद्यालयामधून आपला प्रवेश रद्द करा आणि नवीन महाविद्यालयात(केवळ फक्त ५०/- रु फी भरुन) आपण प्रवेश निश्चित करावा.

९. ज्या विद्यार्थ्यांना पहिल्या पसंतीक्रमाचे कनिष्ठ महाविद्यालय मिळाले आहे ते विद्यार्थी बेटरमेंटसाठी पात्र नसतील.

# इ. ११ वी केंद्रीय प्रवेश २०१६-१७ ची वैशिष्टये.

१. सन २०१६-१७ शैक्षणिक वर्षाची इयत्ता ११वी प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन करण्यात आली. एस.एम.जोशी महाविद्यालय, हडपसर,पुणे हे प्रवेश प्रक्रियेचे मुख्य केंद्र आहे.

२. इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेचे काम व्यवस्थितपणे व्हावे म्हणून केंद्रीय प्रवेश नियंत्रण समितीची स्थापना . करण्यात आली. या समितीत वरिष्ठ अधिकारी, प्राचार्य, उपप्राचार्य,प्राध्यापक यांचा समावेश करण्यात आला आहे.

३. समग्र अशी माहिती पुस्तिका विद्यार्थ्यांना देण्यात आली.

४. प्रवेश प्रक्रियेत सर्व माध्यमिक शाळांच्या मुख्याध्यापकांना त्यांच्याशाळेतील विद्यार्थ्यांना मार्गदर्शनासाठी समाविष्ठ करुन घेण्यात आले आहे.

५. इयत्ता १०वी च्या निकालाच्या अगोदर इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश अर्ज भाग-१ भरण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात आला होता त्यामुळे विद्यार्थ्यांना प्रवेश अर्ज भरण्याचा सराव करता आला.

६. व्यवस्थापन कोटा, इनहाऊस कोटा व अल्पसंख्यांक कोटयातील प्रवेश या वर्षी ऑनलाईन अपडेट होत आहेत. अनेक कनिष्ठ महाविद्यालयांनी केंद्रीय प्रवेश समितीकडे कोटा प्रवेशाच्या जागा ऑनलाईन सरेंडर केल्या.

७. केंद्रीय अथवा कोटा प्रवेशासाठी प्रत्येक विद्यार्थ्यांनी ऑनलाईन फॉर्म भरणे बंधनकारक केले आहे. त्यामुळे कोणत्याही प्रवेशातील विद्यार्थ्यांची माहिती ऑनलाईन प्रक्रियेत उपलब्ध आहे.

८. पसंतीक्रम देताना विद्यार्थ्यांना त्यांच्या राहत्या घराच्या झोन किंवा कोणताही एक झोन टाकणे अनिवार्यकेले आहे. त्यामुळे पसंतीक्रम भरण्याची प्रक्रिया दोन गटांमध्ये केली आहे.

९. विद्यार्थ्याला स्वत:चा फॉर्म दुरुस्त करण्याची सुविधा प्रवेश अर्ज अंतिमतः भरेपर्यंत ठेवण्यात आली तसेच हरकती व त्रुटींची पूर्तता करण्यासाठी स्वतंत्रपणे दोन दिवस देण्यात आले.

१०. एसएससी बोर्डाशिवाय इतर बोर्डाचे तसेच महाराष्ट्र राज्याबाहेरील व भारताबाहेरील विद्यार्थी प्रवेश प्रक्रियेत सहभागी झाले. .

११.इ. ११ वी चे ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेसाठी एसएससी बोर्डाच्या विद्यार्थ्यांकरिता २४ व इतर बोर्डाच्या विद्यार्थ्यां-करिता ९ अशा एकूण ३३ मार्गदर्शन केंद्रावरील ९१ प्राचार्य / प्राध्यापक तसेच १४ अधिकारी असे एकूण १०५ व्यक्ती विद्यार्थ्यांच्या मार्गदर्शनासाठी उपलब्ध करुन देण्यात आले होते.

१२. इ. ११ वी चे प्रवेश ऑनलाईन केल्यामुळे विद्यार्थी व पालक यांचा वेळ, श्रम व पैसा यांची बचत झाली.

१३. इयत्ता १० वी ची निकाल दिनांक ०६ जून २०१६ रोजी जाहीर होवून सर्व प्रवेश प्रक्रिया पूर्ण करुन सर्व कनिष्ठ महाविद्यालये दिनांक १८ जुलै २०१६ रोजी सुरु होत आहेत.

१४. ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया अत्यंत पारदर्शक करण्याचा प्रयत्न यशस्वी होत आहे.

१५. विशेषतः प्रवेश प्रक्रियेसंदर्भात प्रसार माध्यमांकडून वेळोवेळी योग्य पध्दतीने भरपूर प्रमाणात प्रसिध्दी दिली गेली. त्यामुळे पालक व विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रिये संदर्भात माहिती मिळण्यास सुलभता प्राप्त झाली.

१६. विद्यार्थी व पालकांसाठी शैक्षणिक २०१६-१७ च्या केंद्रीय प्रवेशाच्या पहिल्या गुणवत्ता यादीचे संवर्गानिहाय कटऑफ (cutoff) **http://pune.fyjc.org.in** या संकेतस्थळाच्या होमपेजवर स्वतंत्र लिंकद्वारे उपलब्ध आहेत. प्रवेशाबाबत शंका असल्यास हे कटऑफ (cutoff) पाहुन खात्री करावी. माहितीपुस्तिकेतील कटऑफ (cutoff) हे गतवर्षीचे कटऑफ (cutoff) आहेत. आपल्याला ज्या क्रमांकाच्या पसंतीक्रमास प्रवेश मिळाला आहे त्या पसंतीक्रमाच्या अधीच्या पसंतीक्रमांकाचे कटऑफ(cutoff) संकेतस्थळावर पाहुन आपण प्रवेशाबाबत खात्री

कर‍ु शकता.

केंद्रीय प्रवेश पध्दती कार्यान्वित करण्यात ज्यांची प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षारित्या मदत झालेली आहे त्यासर्वांचे इ. ११ वी केंद्रीय प्रवेश समितीकडून मन:पूर्वक आभार.

| (मिनाक्षी राऊत) | (डॉ.अरविंद बुरंगले) | (दिनकर टेमकर) |
|---|---|---|
| सचिव | कार्याध्यक्ष | अध्यक्ष |
| इ. ११ वी केंद्रीय ऑनलाईन प्रवेश नियंत्रण समिती | इ. ११ वी केंद्रीय ऑनलाईन प्रवेश नियंत्रण समिती | इ. ११ वी केंद्रीय ऑनलाईन प्रवेश नियंत्रण समिती |
| तथा | तथा | तथा |
| सहाय्यक शिक्षण संचालक | प्राचार्य | शिक्षण उपसंचालक |